दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●सहसंपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०२ अंक-०३ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शनिवार, ४ मे २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## सर्व महानगरपालिका रुग्णालयांतील परिचारिका काम बंद आंदोलनाच्या पवित्र्यात

# सुरक्षेच्या उपाययोजनांसाठी महापालिका आरोग्यसेवा कर्मचारी संघटना आक्रमक



■ मुंबई, यश सावंत :

कुर्ला येथील मुंबई महानगरपालिकेच्या भाभा रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या परिचारिकेला मारहाण झाल्याप्रकरणी गुरूवारी निदर्शने करण्यात आली. मात्र सुरक्षाविषयक मागण्यांचा गांभीयार्ने विचार होत नसल्याने परिचारिकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी स्वंतत्र समिती नेमणे, तसेच असे प्रसंग पुन्हा घडू नयेत यासाठी नियमांची महिनाभरात अमलबजावणी करावी, अन्यथा सर्व महानगरपालिका रुग्णालयांतील परिचारिका काम बंद आंदोलन करतील, असा इशारा महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या कुर्ला भाभा रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या परिचारिकेला गुरूवारी रात्री महिला रुग्ण व तिच्या कुटुंबियांनी मारहाण केली. रुग्णालयामध्ये रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून डॉक्टर व परिचारिकांवर वारंवार हल्ले होत आहेत. यावरून रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था कमकुवत असल्याचे स्पष्ट होते. तसेच यातून प्रशासनाचा निष्काळजीपणा दिसून येतो, असा आरोप महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेकडून करण्यात आला आहे.

रुग्णालयातील कायमस्वरुपी सुरक्षा रक्षकांच्या अपुऱ्या संख्येमुळे कंत्राटी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येते. मात्र रुग्णांना भेटण्याची वेळ नियंत्रित केली जात नाही. एका रुग्णाला भेटण्यासाठी एकाच वेळी अनेक नातेवाईक कक्षात येतात. त्यामुळे रुग्ण कक्षात असलेल्या परिचारिकांना रुग्ण सेवेत अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या पार्श्वभूमीवर कुर्ला भाभा रुग्णालयातील घडलेला प्रकार हा निषेधार्ह असून, त्याची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्यात यावी, तसेच संबंधितांवर कारवाई करणे गरजेचे आहे.

भाभा रुग्णालयात असे प्रसंग पुन्हा घडू नयेत यासाठी रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थापन बदलणे व त्या अनुषंगाने रुग्णांना भेटण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या संख्येवर मयार्दा घालण्याचे, वेळ निश्चित करण्याचे नियम सुरक्षा विभागाने तंतोतंत पाळणे आवश्यक आहे. तसेच हल्ला झालेल्या परिचारिकेचे उच्च अधिकाऱ्यांमार्फत समुपदेशन करणे आवश्यक आहे. रुग्णालयातील परिचारिका व डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी सुचविण्यात आलेल्या या उपाययोजनांची एका महिन्यांत अमलबजावणी करावी, अन्यथा महानगरपालिका रुग्णालयांतील सर्व परिचारिका काम बंद आंदोलन करतील, असा इशारा महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ॲड.प्रकाश देवदास यांनी दिला.

अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे, उपआयुक्त (मनपा सार्वजनिक आरोग्य) संजय कुऱ्हाडे, सार्वजनिक आरोग्याच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शाह, महानगरपालिकेचे प्रमुख सुरक्षा अधिकारी यांना महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेकडून यासंभार्तील पत्र देण्यात आले आहे.

## सीबीआय केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली नसल्याचा केंद्र सरकारचा सर्वोच्च न्यायालयात दावा



■नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

केंद्रीय अन्वेषण ब्यूरो (सीबीआय) केंद्र सरकारच्या 'नियंत्रणात' नाही, असे केंद्र सरकारने गुरुवारी प्राथमिक आक्षेप नोंदवताना सर्वोच्च न्यायालयात सांगितले. राज्याने सीबीआयला दिलेली सर्वसाधारण संमती मागे घेतली असतानाही सीबीआय एफआयआर दाखल करत आहे आणि त्याचा तपास पुढे चालू ठेवत प्रादेशिक अधिकारक्षेत्रातील प्रकरणांची चौकशी करत असल्याचा आरोप करत पश्चिम बंगाल सरकारने राज्यघटनेच्या कलम १३१ अन्वये केंद्र सरकारविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात मूळ दावा दाखल केला आहे.

केंद्रातर्फे हजर असलेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायमूर्ती बीआर गवई आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सांगितले की, घटनेचे कलम १३१ हे सर्वोच्च न्यायालयाला प्रदान करण्यात आलेले 'सर्वात पवित्र' अधिकारक्षेत्र आहे आणि या तरतुदीचा गैरवापर करण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही. ते म्हणाले की, राज्याने दाखल केलेला खटला आणि त्यात नमूद केलेले खटले केंद्र सरकारने नोंदवलेले नाहीत.

मेहता म्हणाले, ''भारत सरकारने कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही. सीबीआयने त्याची नोंद केली आहे. सीबीआय या प्रकरणाची सुनावणी भारत सरकारच्या नियंत्रणाखाली करत नाही. या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. १६ नोव्हेंबर २०१८ रोजी, पश्चिम बंगाल सरकारने सीबीआयला तपासाबाबत किंवा राज्यात छापे घालण्याबाबत दिलेली 'संमती' मागे घेतली होती.''

## पुणे आरटीओची मोठी कारवाई

# तब्बल ५५ खासगी ट्रॅव्हल्सकडून केला दंड वसूल

■ पुणे, अभिजित येरल्लू:

परराज्यातील प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) नोंदणी करून महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सवर पुण्यात कारवाई सुरू करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांत पुणे 'आरटीओ'ने अशा ५५ ट्रॅव्हल्स बसवर कारवाई करून दंड वसूल केला आहे. पुणे शहरातून दररोज हजारो ट्रॅव्हल्स धावतात. त्यामुळे पुण्यातून इतर शहरांत जाणाऱ्या प्रवाशांची सोय होते; पण काही ट्रॅव्हल्सची नोंदणी इतर राज्यांत करून त्या महाराष्ट्रात चालविल्या जात आहेत. त्यामुळे पुणे आणि राज्याचा महसूल बुडत होता. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पुणे 'आरटीओ'ने त्यांच्या 'भरारी पथका'मार्फत परराज्यात नोंदवून पुण्यात चालविल्या जाणाऱ्या ट्रॅव्हल्सचा शोध सुरू केला. या मोहिमेत



पुण्यात ५५ ट्रॅव्हल्स बस या परराज्यात नोंदणी करून महाराष्ट्रात चालविल्या जात असल्याचे आढळून आले. त्यानुसार 'आरटीओ'ने या ५५ ट्रॅव्हल्सवर कारवाई करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे, अशी माहिती 'आरटीओ'कडून देण्यात आली.

## "मोदीजी को हराना मुश्कीलही नही, नामुमकीन है!" : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ ठाणे, सचिन कदम:

एकीकडे देशाला वाचवायला, लोकशाहीला पुढे नेण्यासाठी आणि विकास करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. तर, दुसरीकडे देश बुडवायला निघालेली इंडिया आघाडी आहे. देशभक्त त्यांना थारा देणार नाहीत. त्यामुळेच मोदी को हराना मुश्कीलही नही, नामुमकीन है, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात केले. तसेच पप्पु आधीच फेल झाला असून त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा फेल करतील, असे सांगत त्यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली.

ठाणे लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी काढलेल्या मिरवणुकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे, राहुल गांधी आणि इंडिया आघाडीवर टीका केली. २०१४ पूर्वी देशात भ्रष्टाचार, दंगली आणि बॉम्बस्फोट घडत होते. पण, त्यानंतर एकदाही बॉम्बस्फोट करण्याची कुणाची हिमंत झाली नाही. कारण,



भारताकडे डोळे वटारून पाहिले तर घरात घुसून मारु असा इशारा मोदींनी दिला. त्यामुळे पुन्हा एकदा मोदी पंतप्रधान होणार आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

घरात बसून किंवा फेसबुक लाईव्ह करून काम करता येत नाही. त्यासाठी जमिनीवर उतरुन काम करावे लागते. गेल्या दोन वर्षांपासून मी जमिनीवर उतरुन काम करतोय. याआधीही मीच काम करत होतो पण, त्याचे श्रेय दुसरे घेत होते, असे सांगत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टिका केली. बाबासाहेबांचे संविधान बदलणार असे विरोधकांकडून बोलले जात असून ते चुकीचे आहे. संविधान बदलले जाणार नाही. देशात संविधान दिवस साजरा करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. तर, बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत पाडण्याचे काम काँग्रेसने केले, असेही ते म्हणाले.

तुम्ही मागच्या उमेदवाराला मताधिक्य देण्याचे काम केले. त्याच्यासाठी मेहनत घेतली. खरे तर त्या उमेदवाराचे काम करायला कार्यकर्ते तयार नव्हते. त्यामुळे मीच उमेदवार असे समजून मतदान करा, असे मला सर्वांना सांगायचे आहे. असा टोला लगावत या निवडणुकीत मागचे सर्व विक्रम मोडीत काढण्याचे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी सर्व कार्यकर्त्यांना केले. तसेच आपण उमेदवार या भावनेने काम करून विरोधकांच्या चारही मुंड्या चित करा परत, विरोधी पक्षाने ठाण्याचे नाव घेत कामा नये, असेही ते म्हणाले.



## वन्यप्राण्यांच्या आणि पक्ष्यांच्या पिल्लांसाठी भारतातील पहिले स्वतंत्र उपचार केंद्र "पेडियाट्रिक सेंटर" नागपुरात सुरू

■नागपूर, विशाल पाटील:

वन्यप्राण्यांच्या आणि पक्ष्यांच्या चिमुकल्या पिल्लांसाठी भारतातील पहिले स्वतंत्र उपचार केंद्र नागपुरात सुरू झाले आहे. या केंद्रात त्यांच्यावर उपचार तर केलेच जातात सोबतच मायेची ऊब देखील दिली जाते. वन्यप्राण्यांवर उपचार, उपचारानंतर त्यांना नैसर्गिक अधिवासात मुक्त करणारे भारतातील पहिले ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्र सुमारे नऊ वर्षांपूर्वी नागपुरात सुरू झाले. राज्याच्या वनविभागाने हे केंद्र सुरू केल्यानंतर अनेक राज्याच्या वनखात्यांनी या केंद्राची पाहणी केली आणि त्यांच्याही राज्यात याच पद्धतीचे ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्र सुरू केले.

नागपुरातील या केंद्राचा अलीकडेच पुनर्विकास करण्यात आला. या केंद्रात वन्यप्राणी तसेच पक्ष्यांच्या पिल्लांसाठी स्वतंत्र 'पेडियाट्रिक वॉर्ड' सुरू करण्यात आला. याआधीही या केंद्रात पिल्लांवर उपचार होत होते, पण आता त्यांच्यासाठी स्वतंत्र वॉर्ड तयार करण्यात आला. याठिकाणी उपचारासोबतच मायेची ऊब देखील दिली जाते. त्यामुळे अतिशय कमी कालावधीत वन्यप्राणी आजारातून मुक्त होत आहेत. मानव-वन्यप्राणी संघर्ष, वन्यप्राण्यांमधील आपसी लढा, तसेच जंगलातील विविध घटनांमध्ये जखमी झालेली, कुटुंबापासून वेगळी झालेली वन्यप्राण्यांची पिल्ले यांना या विशेष वॉर्डात ठेवले जाते. या वॉर्डात सध्या अस्वल, बिबट, कोल्हा, माकड, हरीण, विविध प्रकारचे पक्षी, कासव, साप यांची पिल्ले उपचार घेत आहेत.

पेडियाट्रिक वॉर्डमध्ये सी-आर्म युनिट, डिजिटल एक्स-रे युनिट, अल्ट्रासाऊंड मशीन, मल्टी-पॅरामॉनीटर, गॅसियस अॅनेस्थेसिया वर्क-स्टेशन, हेमो-ॲनालायझर, बायो-केमिकल ॲनालायझर, फिजिओथेरेपी उपकरणे, इनक्यूबेटर, इन्फ्रारेड लाइट थेरपी आदी सुविधा आहेत. विशेष म्हणजे, अनुभवी पशुवैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांची चमू येथे २४ तास तैनात असते.

## मुंबईत मतदानादिवशी सर्वांना मेट्रो तिकिटावर सवलत, महामुंबई मेट्रो संचलन महामंडळाचा निर्णय

■ मुंबई, विशाल कारंडे:

मुंबई मेट्रो मार्ग २ अ आणि ७ च्या सर्व प्रवाशांना २० मे, २०२४ रोजी प्रवासी तिकिटावर (मूळ तिकिट दरावर) १०% सवलत देण्याचा महत्त्वाचा निर्णय महामुंबई मेट्रो संचलन महामंडळाने घेतला आहे. ही सवलत मुंबई मेट्रो १ कार्ड, मोबाईल क्यूआर तिकीट, पेपर तिकीट अशा सर्व माध्यमातून देण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो मार्ग २ अ आणि ७ च्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ९० कोटी नागरिकांनी प्रवास केला असल्याने मुंबई मेट्रोचा उपयुक्तता अधोरेखित झाली आहे. मुंबई मध्ये लोकसभा निवडणूक - २०२४ च्या पाचव्या टप्प्यातील मतदान २० मे, २०२४ रोजी पार पडणार आहे. खरं तर हा लोकशाहीचा उत्सव आहे. मतदार म्हणून मतदान करण्याकरीता या उत्सवात लोकांची भूमिका फार महत्त्वाची आहे. मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूकपणे सहभाग वाढावा यासाठी शासनामार्फत सर्व स्तरातून जनजागृती करण्यात येत आहे. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नागरिकांना



मेट्रोच्या माध्यमातून आरामदायक प्रवास करत, मतदानाचा आपला हक्क बजावता यावा यासाठी महामुंबई मेट्रो प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. लोकसभा निवडणुक २०२४ मध्ये मतदान करण्यासाठी मेट्रो प्रवाशांना प्रोत्साहित करून त्यांच्या मतदानाच्या कर्तृत्वाबाबत जाणीव करून देण्यासाठी, महामुंबई मेट्रो मतदार जागरूकता आणि सहभाग (स्वीप) या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत आहे. मुंबई मेट्रोने जास्तीत जास्त नागरिकांनी प्रवास करावा या दृष्टीने महामुंबई मेट्रो प्रयत्न शील आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करता येईल आणि त्यांना केंद्रापर्यंत आरामदायक प्रवास करता येणार आहे.

## नाशिक हादरलं! क्षुल्लक कारणावरुन महापालिका कर्मचाऱ्याची हत्या; दोघांना अटक

■ नाशिक, नितीन देवळेकर :




दुचाकीस धक्का लागल्याच्या कारणातून झालेल्या वादाचे रुपांतर हाणामारीत होऊन दहा ते बारा जणांच्या टोळक्याने दुसऱ्या टोळक्यावर सशस्त्र हल्ला चढवित एकाची निर्घृण हत्या केली. ही घटना मंगळवारी रात्री साडेअकरा वाजता गोदाघाटावरील कपूरथळा येथे घडली. घटनेत सनी फ्रान्सीस जॉन (वय ३६, रा. बोधलेनगर, उपनगर) या महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याचा वर्मी घाव लागल्याने तडफडून मृत्यू झाला. ते सातपूर अतिक्रमण निर्मूलन विभागात कार्यरत होते. या प्रकरणी पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली आहे. सरकारवाडा पोलिसांत खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला. याप्रकरणी पंचवटी विभागातील सर्व पोलिस ठाण्यांना तपासाचे आदेश आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिले होते. पंचवटी पोलिसांनी संशयित मयूर राजेश पठाडे आणि रोहित उर्फ दादू सुधाकर पेखळे यांना अटक केली आहे. हे दोघे कोणार्कनगर परिसरात आल्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांना समजले. त्यानुसार सहायक निरीक्षख विलास पडोळकर, अंमलदार महेश नांदुर्डीकर, सागर कुलकर्णी, कैलास शिंदे, राकेश शिंदे, कुणाल पचलोरे, गोरक्ष साबळे, अनिल मोरे, घनःश्याम महाले, युवराज गायकवाड यांनी सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. पुढील तपास सरकारवाडा पोलिस निरीक्षक सुरेश आव्हाड यांच्या सूचनेने सहायक निरीक्षक गौतम सुरवाडे करत आहेत. दरम्यान, सनीच्या खून प्रकरणात संशयित योगेश साळी, दादू पेखळे, यश भागवत, मयूर पठाडे, गणेश शिरसाठ यांसह इतरांवर गुन्हा नोंद आहे.

## कल्याण पालिकेच्या उद्यान विभागाने पालिका हद्दीतील वृक्षांची प्रदूषक रोषणाईतून केली मुक्तता

■ कल्याण, रोहित जैसवाल :

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील झाडांवर करण्यात आलेली विद्युत रोषणाई काढून टाकून पालिकेच्या उद्यान विभागाने पालिका हद्दीतील वृक्ष प्रदूषक रोषणाई मुक्त केले आहेत. गेल्या आठवड्यापासून ही मोहीम उच्च न्यायालयाच्या आदेशावरून कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने सुरू केली होती.

पालिका हद्दीतील अनेक झाडांवर काही हॉटेल, ढाबे मालकांनी विद्युत रोषणाई करून झाडांचे विद्रुपीकरण, विद्युत रोषणाई करून प्रदूषण निर्माण केले होते. झाडांवरील पक्ष्यांच्या अधिवासाला, जैवविविधतेला धोका पोहोचविला होता. याविषयी मुंबई उच्च न्यायलयात एक जनहित याचिका दाखल झाली होती. त्यावेळी न्यायालयाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व पालिकांना आपल्या हद्दीत झाडांवर विविध व्यावसायिक, नागरिकांकडून करण्यात आलेली विद्युत रोषणाई तातडीने हटविण्याचे आदेश दिले होते.





कल्याण डोंबिवली पालिकेने टिटवाळा, कल्याण पूर्व, पश्चिम, डोंबिवली पूर्व, पश्चिम, शिळफाटा रस्ता भागातील झाडांवर हॉटेल्स व्यावसायिक, शिकवणी चालक, विकासक, गॅरेज चालक, ढाबे मालक यांनी केलेली विद्युत रोषणाई काढून टाकली. याशिवाय झाडांवर खिळे ठोकून जाहिराती लावणे, झाडांना बाधा होईल अशा प्रकारची कृती करणे अशा नागरिकांवर कारवाई करण्याचा निर्णय मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांनी घेतला आहे.

पालिका हद्दीतील सुमारे तीनशेहून अधिक झाडांवरील विद्युत रोषणाई काढून टाकण्यात आली आहे. या कामासाठी उद्यान विभागाने विशेष पथके तयार केली होती. झाडांना विद्युत रोषणाई केल्याने या झाडांवरील पक्ष्यांच्या अधिवासाला धोका उत्पन्न होत असल्याचे, याशिवाय झाडावर विविध प्रकारचे परिणाम होत असल्याची निरीक्षणे पर्यावरण अभ्यासकांनी काढली आहेत. मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डोंबिवलीचे उद्यान अधीक्षक महेश देशपांडे आणि पथकाने ही कारवाई केली.

## अतिरिक्त फीसाठी निकाल राखीव, उरणमध्ये पालक संघटनेची शाळेविरोधात पोलिसांत धाव



■ नवी मुंबई, भावना जैन:

उरण येथील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित युईएस शाळा व्यवस्थापनाने ओळखपत्र, डायरी, ई-लर्निंगची अतिरिक्त फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांचे निकाल देण्यास नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या पालक संघटनेचे पदाधिकारी, पालक, विद्यार्थ्यांनी शाळा व्यवस्थापनाविरोधात गुन्हा नोंद करण्यासाठी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

राज्यभर बुधवारी महाराष्ट्र दिनाची धामधूम असतानाच उरणमध्ये मात्र पालक- विद्यार्थ्यांना न्यायासाठी पोलिसांत धाव घ्यावी लागल्याने शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला. उरण एज्युकेशन सोसायटीची विद्यार्थ्यांकडून ओळखपत्राच्या नावाखाली ५५०, डायरी-१००, ई-लर्निंग-१२०० अशी अतिरिक्त शुल्काची रक्कम शाळा व्यवस्थापनाकडून वसूल करीत असल्याचा आक्षेप घेत पालक-शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांनी विरोध केला आहे.

या संदर्भात उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागानेही २९ एप्रिल २०२४ रोजी ओळखपत्र, डायरी आदी अतिरिक्त फी वसुलीसाठी कोणत्याही विद्यार्थ्यांचे निकाल रोखता येणार नाहीत असे लेखी आदेश दिले आहेत. त्यामुळे पालकांनी शाळा व्यवस्थापनाच्या विरोधात कॅपिटेशन ॲक्ट तरतुदींचा भंग केल्याप्रकरणी व्यवस्थापनावर गुन्हा नोंद करण्यासाठी उरण पोलिस ठाण्यात जमा झाले होते. मात्र उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी शाळा व्यवस्थापन आणि पालक-शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन यावेळी शाळा व्यवस्थापनाने अतिरिक्त फी वसुली न करता विद्यार्थ्यांना निकाल देण्याचे मान्य केले. तसे संदेश पालकांना व्हॉट्सॲपवर कळविण्यासही संमती दिली. यानंतरच पालक शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, पालक माघारी परतले.

## गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्याचं आरक्षण शनिवारपासून होणार सुरू

■ रत्नागिरी, दिगंबर जाधव :

कोकणकरांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्याचं आरक्षण शनिवारपासून (ता. ४) सुरू होणार आहे. यंदाच्या वर्षी ७ सप्टेंबरला गणेश चतुर्थी आहे. त्यासाठी १२० दिवस आधीपासूनच कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे बुकिंग सुरू होणार आहे. त्यामुळं यंदा चाकरमान्यांना कन्फर्म तिकिट मिळण्याची दाट शक्यता आहे. गणेशोत्सव आणि कोकण यांचे वेगळेच नाते आहे. दरवर्षी कोकणात गणेशोत्सवाचा सण धुमधडाक्यात साजरा केला होता. यासाठी मुंबईतील अनेक चाकरमानी कोकणात जात असतात. मात्र, गावाकडे जाण्यासाठी त्यांना दोन महिने आधीपासूनच तयारी करावी लागते. कारण, गणेशोत्सवाच्या काळात लवकर तिकीट मिळत नाही. तसेच ट्रेनमध्ये मोठी गर्दी देखील असते. त्यामुळे रेल्वे प्रशासनदेखील



गणेशोत्सवासाठी ज्यादा गाड्या सोडते. याशिवाय तिकीट बुकिंगला देखील दोन ते तीन महिन्यांच्या आधीच सुरूवात होते. यंदा कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे बुकिंग शनिवार ४ मेपासून सुरू होत आहे. त्यामुळं यंदा चाकरमान्यांना कन्फर्म तिकिट मिळण्याची दाट शक्यता आहे. नागरिकांनी लवकरात लवकर तिकिटांचे बुकिंग करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. तसंच, गणेशोत्सव स्पेशल गाड्याही लवकरच सोडण्यात येतील, त्याबाबत अधिकृत माहिती जाहीर केली जाईल, असंही सांगण्यात आलं आहे.

**गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या ट्रेनचे वेळापत्रक :**

- शनिवार ४ मे २०२४ रोजी १ सप्टेंबरचं रेल्वे आरक्षण सुरु होईल. प्रवासी ऑनलाइन तिकीट बुकिंग करू शकता.
- रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या मार्गावर जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचं बुकिंग मंगळवार ७ मे रोजी सुरु होईल.
- ६ सप्टेंबर रोजी हरतालिका असून याच बुकिंग गुरुवारी ९ मे पासून सुरु होईल.
- ७ सप्टेंबरला गणेश चतुर्थी असून यादिवशी घरोघरी गणरायांचे आगमन होईल. तेव्हा रेल्वे बुकिंग शुक्रवार १० मे रोजी सुरु होईल.

# व्हेज खिमा रोल

**साहित्य:** सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



**कृती:** सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

# नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

**नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.**

**कित्येक** शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.

# जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे



▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

# लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

**वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.**

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या



माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

# 'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

**'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.**

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लॉंच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते ॲंड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रॅंडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

**ॲप कसे काम करते?**

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पयार्यांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील.

या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

**केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा**

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

# 'मिर्झापूर', 'पंचायत', 'आश्रम' अन्... 'या' लोकप्रिय वेब सीरिजचे पुढचे सीझन ओटीटीवर केव्हा येणार?




मनोज बाजपेयींची 'फॅमिली मॅन' असो वा जितेंद्र कुमारची 'पंचायत'. अशा अनेक वेब सीरिज आहेत, ज्यांनी प्रेक्षकांच्या मनावर छाप सोडली आहे. या सीरिजचे पहिले भाग खूप लोकप्रिय झाले आणि नंतर त्याचे सिक्वेल आले. काहींचे तर त्याहून जास्त सीझन आले. या शोची लोकप्रियता इतकी आहे की निमार्तेही त्याचे पुढचे भाग आणत आहेत. आता लवकरच अनेक लोकप्रिय सीरिजचे पुढचे सीझन प्रेक्षकांना ओटीटीवर पाहता येणार आहे. कोणत्या आहेत या सीरिज, पाहा यादी.

**मिझार्पूर ३ :** पंकज त्रिपाठी व अली फजल यांच्या मुख्य भूमिका असलेल्या मिझार्पूरचे आतापर्यंत दोन सीझन रिलीज झाले आहेत. दोन्ही सीझनला प्रेक्षकांनी खूप पसंत केलं. त्यानंतर आता तिसरे सीझन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सीरिजच्या तिसऱ्या सीझनचं शूटिंग पूर्ण झालंय, पण त्याच्या रिलीजच्या तारखेची घोषणा अद्याप झालेली नाही. मिझार्पूर ३ जून किंवा जुलैमध्ये येण्याची शक्यता आहे.

**असुर ३ :** या सुपरहिट सायकोलॉजिकल ड्रामामध्ये अरशद वारसी, बरुण सोबती, अनुप्रिया गोएंका, रिद्धी डोगरा व शारिब हाश्मी झळकले होते. या सीरिजचा तिसरा भाग लवकरच येईल असं म्हटलं जातंय.

**दिल्ली क्राइम ३ :** या सीरिजच्या पहिल्या भागात सामुहिक बलात्कार झालेल्या तरुणीची कहाणी दाखवण्यात आली होती, दुसऱ्या भागात खूनाची कहाणी दाखवण्यात आली होती. आता लवकरच या सीरिजचा तिसरा भाग येणार आहे.

**फॅमिली मॅन सीझन ३ :** फॅमिली मॅन ही एक स्पाय थ्रिलर वेब सीरीज आहे. जी राज व डीके यांचं क्रिएशन असलेली ही सीरिज प्राइम व्हिडीओवर उपलब्ध आहे. यात मनोज बायपेयी, प्रियमणी, शरद केळ्कर, नीरज माधव, शारीब हाश्मी, दलीप ताहिल आणि सनी हिंदुजा सारखे कलाकार होते. दुसऱ्या पर्वात यात समांथा रुथ प्रभू होती. आता लवकरच या सीरिजचा तिसरा सीझन प्रदर्शित होणार आहे.

**आश्रम ४ :** बॉबी देओलच्या क्राइम ड्रामा सीरिजचे तीन सीझन आतापर्यंत आले आहेत. या लोकप्रिय सीरिजचे दिग्दर्शक प्रकाश झा आहेत. एमएक्स प्लेअरवर ही सीरिज उलब्ध आहे. बॉबी देओल, अदिती पोहनकर, दर्शन कुमार, अनुप्रिया गोएंका आणि ईशा गुप्ता या कलाकारांची मांदियाळी असलेल्या सीरिजचा चौथा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येईल.

**पंचायत ३ :** हे व्हायरल फिव्हर निर्मित 'पंचायत ३' प्राइम व्हिडीओवर पाहता येईल. यात जितेंद्र कुमार, रघुबीर यादव, नीना गुप्ता आणि सान्विका यांच्या भूमिका आहेत. या सीरिजचे दोन सीझन आले असून तिसरा सीझन २८ मे रोजी रिलीज होणार आहे.

**फर्जी २ :** शाहिद कपूरच्या या थ्रिलर सीरिजचा पहिला भाग प्रेक्षकांना खूप आवडला होता. या मालिकेत शाहिद व्यतिरिक्त विजय सेतुपती, केके मेनन, राशी खन्ना आणि भुवन अरोरा यांच्या भूमिका होत्या. या सीरिजच्या दुसऱ्या सीझनचं शूटिंग सुरूझालं आहे आणि ते लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येईल.

# महाराष्ट्रात मराठी सिनेमांबाबत मल्टीप्लेक्सवाल्यांच्या मुजोरीवर प्रसादचं मत



''स्पर्धा करत नाही असं काही नाही. माझ्याच चित्रपटांनी म्हणजे बाकीच्यांची पण मी उदाहरण देऊ शकेन. पण 'हिरकणी'समोर चार हिंदी चित्रपट होते. 'मेड इन चायना' होता. 'हाऊसफुल ४' होता, 'सांड की आंख' होता आणि चौथा कोणता तरी होता. हे चारही चित्रपट पडले आणि 'हिरकणी' सुपरहिट चालला. 'चंद्रमुखी' २९ एप्रिल २०२२ला आला. 'धर्मवीर' १३ मे २०२२ला आला आणि २८ मे २०२२ला 'हंबीरराव' आला. लागोपाठ तीन मराठीतले सुपरहिट, मोठे चित्रपट आले. त्यांच्यासमोर एकही हिंदी चित्रपट चालला नाही. त्यामुळे स्पर्धा करत नाही, असं नाहीये.'' मराठी सिनेमे आणि महाराष्ट्रातील सिनेमागृहात त्यांना मिळणारं स्थान हा नेहमीच चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला आहे. अनेकदा निर्माते दिग्दर्शक पाण्यासारखा पैसा खर्च करतात पण मल्टिप्लेक्सवाले त्यांना जागाच देत नाही त्यामुळे ते सिनेमे प्रेक्षकांपर्यंत नीट पोहचतच नाही. या मुद्द्यावर अनेकदा वाद होतात पण नंतर ते तिथल्या तिथे मिटतात. आता अभिनेता प्रसाद ओकने पुन्हा एकदा मुद्द्यावर भाष्य केलं आहे. 'कॉकटेल स्टुडिओ' या युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत प्रसाद म्हणाला की ''जे मराठीत छोटे चित्रपट आहेत, त्यांना चित्रपटगृह मिळताना खूप समस्या येत आहेत. ही मल्टीप्लेक्सवाल्यांची मुजोरी आहे. ज्याबद्दल वारंवार बोललं गेलेलं आहे. वारंवार याबद्दलची आंदोलन झाली आहेत. राज ठाकरे साहेबांनी खळ्ळखट्याक सारखं आंदोलन केलं आहे. वारंवार राज साहेबांसारखा नेता मराठी चित्रपटसृष्टीसाठी धावून आलेलाच आहे, हे मान्य केलंच पाहिजे. तरी सुद्धा वारंवार येणारं सरकार त्यावर ठोस पाऊल उचलत नाहीये, हे देखील तितकंच आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपटांना प्राइम टाइम मिळलाच पाहिजे, तो आमचा हक्क आहे. याच्यासाठी भीक मागायची वेळ येता कामा नये. हे उघड सत्य आहे. पण या समस्येकडे ज्या सरकारच लक्ष जाईल आणि जे सरकार याच्यावरती तोडगा काढेल त्याच्यानंतरच काय ते होईल.''

# दै. लोकरक्षणाय सुडोकू - ७३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | | 5 | | | 6 | 1 | 4 |
| 3 | | | | | | | | 2 |
| 1 | 6 | 9 | | 7 | 4 | | 5 | |
| | 4 | 5 | | 2 | | | | |
| 9 | | 3 | | | | | 4 | |
| 6 | 2 | 1 | | | 8 | 9 | | |
| | | 8 | 1 | | | | | |
| 4 | | | | 6 | | | | |
| | | | | 3 | 9 | 8 | | |

## उत्तर सुडोकू -७२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 6 | 2 | 4 | 9 | 8 | 5 | 7 |
| 8 | 4 | 7 | 1 | 3 | 5 | 2 | 6 | 9 |
| 5 | 9 | 2 | 6 | 8 | 7 | 1 | 3 | 4 |
| 9 | 2 | 3 | 7 | 1 | 6 | 5 | 4 | 8 |
| 4 | 1 | 5 | 9 | 2 | 8 | 6 | 7 | 3 |
| 6 | 7 | 8 | 3 | 5 | 4 | 9 | 1 | 2 |
| 2 | 5 | 4 | 8 | 6 | 3 | 7 | 9 | 1 |
| 7 | 6 | 1 | 4 | 9 | 2 | 3 | 8 | 5 |
| 3 | 8 | 9 | 5 | 7 | 1 | 4 | 2 | 6 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# दिनविशेष

## ४ मे

- ◆१७९९: श्रीरंगपट्टणमच्या लढाईत टिपू सुलतान ब्रिटिशांकडून मारला गेला.
- ◆१८५४: भारतातील पहिले टपाल तिकीट प्रकाशित झाले.
- ◆१९०४: अमेरिकेने पनामा कालव्याच्या बांधकामास सुरुवात केली.
- ◆१९१०: रॉयल कॅनेडियन नेव्ही ची स्थापना.
- ◆१९५९: पहिले ग्रॅमी पुरस्कार आयोजीत केले गेले.
- ◆१९६७: श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर नाशिक येथील मंदिरात जाऊन देवाची पूजा करण्याचा अधिकार सर्वांना आहे असा उच्च न्यायालयाचा निर्णय.
- ◆१९७९: मार्गारेट थॅचर युनायटेड किंग्डमच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.
- ◆१९८९: सर्व पंचायत समित्यांमध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव, अशी घोषणा पंतप्रधान राजीव गांधी यांनी केली.
- ◆१९९२: संगीतकार भूपेन हजारिका यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला.
- ◆१९९५: महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने बॉम्बे हे नाव बदलून मुंबई असे नामकरण करण्याचा निर्णय घेतला.
- ◆१९९६: जागतिक वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारताला ६ तर एन. कुंजुराणीदेवीला दोन रौप्यपदके मिळाली.
- ◆१००८: पर्शियन सूफी संत ख्वाजा अब्दूल्ला अन्सारी यांचा जन्म.
- ◆१००८: फ्रान्सचा राजा हेन्री (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑगस्ट १०६०)
- ◆१६४९: बुंदेलखंड चे महाराजा छत्रसाल बुंदेला यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १७३१)
- ◆१६५५: पियानोचे निर्मिते बाटोलोमीओ क्रिस्टोफोरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १७३१)
- ◆१७६७: दाक्षिणात्य संगीतकार त्यागराज यांचा जन्म. (मृत्यू: ६ जानेवारी १८४७)
- ◆१८२५: ब्रिटीश जीवशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक थॉमास हक्सले यांचा जन्म. (मृत्यू: २९ जून १८९५ झ्र इस्ट्बोर्न, इंग्लंड)
- ◆१८४७: धार्मिक आणि राष्ट्रीय मनोवृत्तीचे पुण्यातील एक नामांकित धन्वंतरी व लोकमान्य टिळकांचे स्नेही महर्षी विनायक रामचंद्र उर्फ अण्णासाहेब पटवर्धन यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९१७)
- ◆१९२८: इजिप्तचे ४थे राष्ट्राध्यक्ष होस्नी मुबारक यांचा जन्म.
- ◆१९२९: ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या (UNICEF) सदिच्छा प्रतिनिधी ऑड्रे हेपबर्न यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी १९९३)
- ◆१९३३: प्रख्यात मराठी कादंबरीकार बाबा कदम यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर २००९)
- ◆१९३४: भावगीत गायक अरुण दाते यांचा जन्म.
- ◆१९४०: इंग्लिश कादंबरीकार रॉबिन कुक यांचा जन्म.
- ◆१९४२: विज्ञान आणि तंत्रज्ञान सल्लगार सॅम पित्रोदा यांचा जन्म.
- ◆१९४३: भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्रसांत पटनाईक याचा जन्म.
- ◆१९४५: ज्येष्ठ पत्रकार एन. राम यांचा जन्म.
- ◆१९८४: बांगला देशचा क्रिकेटपटू मंजुरूल इस्लाम यांचा जन्म. (मृत्यू: १६ मार्च २००७)
- ◆१७९९: म्हैसूरचा वाघ टिपू सुलतान यांचा श्रीरंगपट्टण येथे मृत्यू. (जन्म: २० नोव्हेंबर १७५०)
- ◆१९३८: ज्युदोचे संस्थापक कानो जिगोरो यांचे निधन. (जन्म: २८ ऑक्टोबर १८६०)
- ◆१९८०: आधुनिक कवी, चतुरस्त्र लेखक, पत्रकार आणि नाटककार अनंत कानेटकर उर्फ आत्माराम यांचे निधन.

# भविष्य

**मेष** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळहोणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल.महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल.

**सिंह** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रूंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील.वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील.वेळ व पैसा वाया

**कुंभ** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल.अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# कोटीच्या कोटी उड्डाणे!

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाचा पुन्हा एकदा विक्रम झाला आहे. यावेळचा विक्रम अधिक महत्त्वाचा; याचे कारण एप्रिल महिन्यातील जीएसटीचे संकलन दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून पुढे गेले आहे. सात वर्षांपूर्वी जीएसटी लागू झाला तेव्हा पहिल्या वर्षी सरासरी मासिक संकलन ८२ हजार कोटी रुपये होते. यावरून जीएसटीने किती मोठी मजल मारली आहे, याचा अंदाज यावा. निवडणुकांचा माहोल असल्याने एप्रिलमधील विक्रमी जीएसटी संकलन सत्ताधाऱ्यांना सुखावणारे आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या प्रतिक्रियेवरूनही याचा अंदाज येतो. त्यांच्या मते, या जीएसटी संकलनामध्ये अर्थव्यवस्थेच्या सक्षमतेचे प्रतिबिंब पडले आहे. हे काही प्रमाणात खरे आहे. याचे कारण, इतक्या मोठ्या प्रमाणात व्यवहार, खरेदी-विक्री, उत्पादन, आर्थिक देव-घेव झाल्याशिवाय करसंकलन वाढणार नाही. जीएसटीचे एकूण संकलन वाढणे, याचाच अर्थ त्यातील राज्यांच्या वाट्याला येणारी रक्कमही वाढणे. त्यामुळे, या आकड्यांवर राज्येही खूष असणार, यात शंका नाही. मात्र, केवळ या मोठ्या आकड्यांवर भाळून देशातील करप्रणाली, एकूण अर्थव्यवस्था आणि जीएसटीचे वर्तमान व भविष्य यांच्याबाबत निःशंक व आश्वस्त राहायचे का, याचा विचार होणे आवश्यक आहे. मुळात, सध्या जीएसटीचे चार प्रकारचे दर आहेत. पाच, १२, १८ आणि २८ टक्के. ही करआकारणी कितीतरी जास्त आहे. विजेवर चालणाऱ्या अनेक ग्राहकोपयोगी वस्तू १८ टक्क्यांच्या वर्गवारीत येतात. तसे म्हटले तर पाचनंतरचे तीनही टप्पे हे वस्तू आणि सेवांवर भरपूर कर आकारणी करणारे आहेत. केंद्र सरकारने केवळ तिजोरीतील जीएसटीचा ओघ कसा वाढतो आहे; यावर समाधान न मानता जीएसटी करांची फेररचना करण्याची गरज आहे. संपूर्ण देशाची एकच बाजारपेठ आणि दुहेरी कर आकारणीपासून सुटका, असे जीएसटीचे मूलभूत तत्त्व असले तरी देशाच्या अर्थकारणाचा गाडा प्रामुख्याने ज्या पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतींवर चालतो; ते या करजाळ्यात येतच नाहीत. आज पेट्रोल किंवा डिझेल यांची आयात किंमत आणि ग्राहकांना मोजावी लागणारी किंमत यांच्यात जी प्रचंड तफावत आहे; त्याचे मुख्य कारण त्यावरचे कर हेच आहे. केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना या करांतून मोठा निधी मिळत असतो. पेट्रोल व डिझेल यांच्यावरील करसंकलनात या सरकारच्या काळात पाचशे टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. मग सरकारने जी इच्छाशक्ती जीएसटी आणताना दाखविली; तीच इच्छाशक्ती दाखवून पेट्रोल, डिझेल, इंधनवायू यांनाही जीएसटीत का आणू नये? अर्थमंत्री सीतारामन या 'पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आणण्यास आपला विरोध नाही...' असे म्हणत असतात. पण सर्व राज्यांचे यावर एकमत होणार नाही, हे त्यांना माहीत आहे. याचे कारण, हा उत्पन्नाचा मोठाच स्रोत आहे. मात्र, पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आले तर चलनवाढीला आळा बसून एकूण अर्थकारणाला किती मोठी चालना मिळू शकेल, याचे अनेक अभ्यास प्रकाशित झाले आहेत. जीएसटीचे जाळे असे विस्तारले तर ग्राहकोपयोगी छोट्या छोट्या वस्तूंवरचा जीएसटीचा बोजाही सरकारला कमी करता येईल. अप्रत्यक्ष कर हा नेहमीच 'सब घोडे बारा टक्के' असे म्हणत समाजातील दुर्बळांची क्रयशक्ती तुलनेने कमी करीत असतो. महिन्याला २० हजार रुपये मिळविणाऱ्यांनी साबण किंवा डिटर्जंटवर १२ टक्के जीएसटी भरणे आणि दोन लाख मिळवणाऱ्यांनीही तितकाच भरणे; यातून या अप्रत्यक्ष करचनेतील विषमतेचे स्वरूप लक्षात येईल. मात्र, अशी विषमता दूर करण्यासाठी प्रत्यक्ष कराची - विशेषतः प्राप्तिकराची - वसुली प्रामाणिकपणे आणि जाळे विस्तृत करून करावी लागते. आपली करप्रणाली यात सातत्याने कमी पडते आहे. प्रत्यक्ष करांची वसुली अर्थकारणाच्या प्रमाणात होत नसल्याने जीएसटीचा प्रचंड बोजा आज सामान्य ग्राहकांवर पडतो आहे. सरकार सक्तीने करीत असलेली धान्यखरेदी (लेव्ही) हेदेखील साजरी करायची गोष्ट आहे; असा विपरीत संस्कार इथल्या शेतकऱ्यांवर होता. तशीच गत जीएसटीच्या वाढत्या आकड्यांनी आनंदी होणाऱ्या सामान्य नागरिकांची होऊ नये. जीएसटी व्यवस्थेत दुहेरी कर आकारणी पूर्णपणे संपलेली नाही. तसेच, व्यावसायिक, उद्योजकांना जीएसटीचा परतावाही वेळेत व वेगाने मिळतोच, असे नाही. अनेकदा त्यांचा व्यवहार सफल होत नाही; कर मात्र आधीच कापून गेलेला असतो. जीएसटी ही फार मोठी कर सुधारणा आहे, यात शंकाच नाही. सात वर्षांपूर्वी ती करून मोदी सरकारने धाडसी, आवश्यक पाऊल टाकले. पण गेल्या काही काळात जीएसटीच्या वाढत्या संकलनावरच सरकार खूष दिसते आहे. तिजोरीत इतका प्रचंड पैसा नियमित व बिनबोभाट येऊन पडणे कोणत्या राज्यकर्त्यांना आवडणार नाही? मात्र, आता जीएसटीचे जाळे विस्तारणे, काही वस्तूंवरील करांची टक्केवारी कमी करणे आणि करसंकलन व परताव्यात अधिक पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. करसंकलनाचे विक्रम होणे याचा अर्थ करपद्धती निर्दोष, सर्वजनहिताची झाली, असे नाही.

# निवडणुकीच्या आतले 'युद्ध'




**भारताच्या अंतर्गत घडामोडींवर ब्रिटिश खासदार, जर्मन अधिकारी, रिहानासारखे स्टार मतप्रदर्शन करतात, त्यांना पाठिंबा कसा काय? ईडी-सीबीआयच्या कारवाया नियमानुसार होत असूनही शंका का? यामागे मोठे षड्यंत्र तर नाही ना? असे प्रश्न विरोधी पक्षीयांबाबत उभे करणारे टिपण...**

निवडणूक ही लढाई असली तरी ते युद्ध नव्हे. निवडणुकीत जय पराजय असला आणि पूर्ण क्षमतेने लढायचे असले तरीही ते युद्ध नसते. विनाशकारी युद्ध तर नक्कीच नाही. भाजप ही निवडणूक राजकीय लढाईसारखी लढत आहे; पण या देशातील विरोधक ही निवडणूक युद्ध म्हणून लढत आहेत. जसजशी निवडणूक पुढे सरकते आहे तसतसा हा फरक मतदाराच्या लक्षात येऊ लागला आहे, तो येणारच- कारण

मतदार नेहमीच अत्यंत जागरूक असतोच. निवडणूक हा लोकशाहीचा महोत्सव आहे. या महोत्सवाच्या 'आत' काही वेगळे घडतेय का? काय वेगळे शिजते आहे का? ही निवडणूक विरोधक 'युद्ध' म्हणून का लढत आहेत? काही भयंकर बेतलेले तर नाही ना? अशा काही प्रश्नांच्या उत्तरांचा आपण शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच 'ईव्हीएम'बाबत ज्या याचिका फेटाळल्या तेव्हा न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी अत्यंत गंभीर टिप्पणी केली आहे. ते म्हणतात की, ''भारताने प्रामाणिक समर्पित मनुष्यबळाच्या जोरावर महत्त्वपूर्ण कामगिरी केली असली तरी देशाचे यश, कामगिरीला कमी लेखण्याचे प्रयत्न काही हितसबंध असलेल्या गटाकडून सुरू असल्याचे अलीकडे दिसते आहे. भारताची प्रगती क्षीण करण्याचे आणि अविश्वास दर्शवून तिचे महत्त्व कमी करण्याचे एकत्रित प्रयत्न प्रत्येक आघाडीवर सुरू असल्याचे दिसून येत असून हे प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत.''

याच याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, ''प्रत्येक गोष्टीवर शंका घेता येत नाही. अतिसंशय ही एक मोठी समस्या बनली आहे.'' आपल्या देशासमोरची गंभीर आणि मोठी समस्या काय आहे? तर 'अतिसंशय!' काय आहे ही नेमकी समस्या..? कोण घेतेय अतिसंशय..? कसा घेतला जातोय अतिसंशय? कशावर घेतला जातोय अतिसंशय..? असे प्रश्न बरेच उपस्थित होत आहेत, मग या देशातील तथाकथित बुद्धिवंतांनी यावर कोणतेही भाष्य का केलेले नाही? एरवी पेटून उठणारे आता कुठे आहेत? देशाच्या या गंभीर बाबीवर का बोलत नाहीत? कारण तेच या षड्यंत्राचे भाग तर नाहीत ना? असा प्रश्नही पडतो.

**मोदींच्या नावावर, व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

या सगळ्या प्रश्नांचा धांडोळा घेण्यासाठी थोडे मागे जावे लागेल. या देशात ज्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आले त्यानंतर देशातील काही शक्तींनी आणि विरोधी पक्षांनी एक मोठा अजेंडा होती घेतला. ते मोदींच्या योजनांवर प्रश्न विचारताना दिसत नाहीत, ते मोदींच्या धोरणांवर प्रश्न विचारत नाहीत, तर ते या देशातील व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करीत आहेत. ते मोदींच्या नावाने जरूर प्रश्न विचारत आहेत पण हे सगळे प्रश्नकर्ते इथल्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करू पाहत आहेत.

'अतिसंशय हीच या देशासमोरची गंभीर समस्या आहे' आणि हे जाणीवपूर्वक केले जात आहे. त्याची पाळेमुळे आपण शोधत गेलो तर ती खोल रुतलेली आहेत पण ती फार जुनी नाहीत.

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी अमेरिकेत केलेल्या भाषणात सांगतात की, 'भारतातील लोकशाही धोक्यात आली आहे.' हे का? काँग्रेस, डावे आणि विरोधी पक्षांचा तोच अजेंडा आहे का? म्हणून अतिसंशय ही आजची गंभीर समस्या आहे.

याच शंकेखोरांनी ईव्हीएमसारख्या यंत्रणेला प्रश्नांकित केले. जी ईव्हीएमची यंत्रणा काँग्रेस सरकारच्या काळात आणली गेली. त्याच ईव्हीएमवर काँग्रेसची सरकारे निवडून आली तेव्हा ती चांगली होती आज त्याच ईव्हीएमला शंकेच्या पिंजऱ्यात का उभे केले गेले? निवडणुकीबाबतच प्रश्नचिन्ह का निर्माण केले?

काँग्रेसचे नेते सॅम पित्रोदा म्हणतात की, ''या देशाचे संविधान तयार करण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापेक्षा पंडित जवाहरलाल नेहरूंचे योगदान होते.'' (हे ट्वीट त्यांनी नंतर डिलीट केले!) भारतीय

संविधान निमार्णात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वात जास्त योगदान होते हे सत्य भारतीय शाळकरी मुलापासून सगळ्या जगाला माहिती आहे, पण या महापुरुषाच्या योगदानाबाबतसुद्धा अतिसंशयाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न का केला जातो आहे?

याच अतिशंकेखोरांनी 'सर्जिकल स्ट्राइक'वरदेखील शंका घेऊन सैन्यदलांच्या विश्वासार्हतेवर का प्रश्नचिन्ह निर्माण केले? कृषी सुधारणा कायदे संसदेत पारित झाल्यानंतर या देशातील शेतकऱ्यांचे आंदोलन उभे राहिले. शेतकऱ्यांना त्याबाबत आपले मत मांडण्याचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य आहे, त्यांनी मत मांडलेच पाहिजे, देशाअंतर्गत यावर चर्चा, आंदोलने होऊ शकतात आणि झाली. पण त्यावर ब्रिटिश पार्लमेंटमध्ये चर्चा का? त्या खासदारांचे समर्थन का? कशासाठी? हा अतिसंशय नव्हे?

मग रिहानासारखी पॉपस्टार समर्थन करू लागली, जे इथले विरोधक बोलत होते तेच हे स्टार परदेशातून बोलू लागले, हे काय होते? हाच तर अतिसंशय! त्यावर भारतरत्न लता मंगेशकर आणि सचिन तेंडुलकर म्हणाले की, 'रिहानासारख्यांनी आमच्या देशाअंतर्गत मामल्यात पडू नये' त्यावर शंकेखोरांनी मग भारतरत्न असलेल्या व्यक्तिमत्त्वांवरसुद्धा अतिसंशय घेणे सोडले नाही!

**कारवाई कायद्यानुसारच**

संसदेवर हल्ला करणारा दहशतवादी अफजल गुरूला फाशीची शिक्षा न्यायालयाने सुनावली, सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली.. पण दिल्लीच्या जेएनयूमध्ये ''अफजल तेरे कातील जिंदा है..'' म्हणून या देशाच्या न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरही अतिसंशय घेतला गेला होता. त्याचीच पुनरावृत्ती दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळ्यात चौकशी करून, कायदेशीर पद्धती अवलंबून, आवश्यक पुरावे गोळा करून, सर्व न्यायिक प्रक्रिया पूर्ण करून अटक झाली त्यानंतर त्यांच्या अटकेबाबत जर्मन दूतावासातील प्रवक्ता भारतीय घटनेवर अतिशंका घेतो आणि प्रतिक्रिया देतो. का? याचे समर्थन इथले विरोधक का करतात?

सीबीआय, ईडी या संस्था या देशातील काळ्या पैशाच्या विरोधात कारवाई करतात, अटक होतात, न्यायालयात खटले चालतात, त्यामध्ये काही जणांना जामीन मंजूर होतात, कायद्याप्रमाणे ही सगळी कारवाई केली जाते पण या यंत्रणांवरही अतिसंशय का? हे कुठल्या एकाच क्षेत्रात नाही तर राम मंदिराच्या तारखेवर, राम मंदिराच्या जागेवर, 'रामवर्गणी'वरही का शंका घेतली गेली?

अतिसंशय ज्या ज्या बाबतीत घेतला गेला अशी प्रत्येक क्षेत्रातील बरीच उदाहरणे, घटना सांगता येतील. एकूणच काय तर लोकशाहीचे चारही स्तंभ, लोकशाहीच्या सर्व संस्था, या देशाची अर्थव्यवस्था, न्यायव्यवस्था, समाजव्यवथा, धार्मिक व्यवस्था, फिल्म, खेळ, उद्योग अशा प्रत्येक व्यवस्थेबाबत अतिसंशय घेतला जातो आहे.

भ्रामक, निरर्थक प्रश्नांच्या पिंजऱ्यात उभे केले जाते आहे. या देशात काहीच ठीक चाललेले नाही. सगळे काही कोलमडून गेले आहे, देश खिळखिळीत झालाय असे अत्यंत दुर्दैवी चित्र हे शंकेखोर जगासमोर उभे करू पाहत आहेत. या देशात येणारे उद्योग, गुंतवणूक या सगळ्याला खीळ बसवून देश उद्ध्वस्त करू पाहत आहेत. म्हणून ही बाब अत्यंत गंभीर आहे, म्हणून अतिसंशय ही या देशातील एक मोठी समस्या आहे आणि म्हणूनच हे मोठे षड्यंत्र आहे का? यामध्ये देशाबाहेरील शक्ती आहे का? असे प्रश्न पडले तर गैर काय?

निवडणुकीत खर्च होणारा देशाचा वेळ, पैसा, यंत्रणांवरील ताण कमी करण्यासाठी 'वन नेशन वन इलेक्शन' अशी संकल्पना मांडली जाते, त्याला विरोधकांचा विरोध का? करात सुसूत्रता यावी, अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी निर्णय झाला तरी आरबीआयच्या माजी गव्हर्नरांसह सगळे प्राप्तिकर यंत्रणेवर का प्रश्चचिन्ह निर्माण करतात?

जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी 'एक भारत श्रेष्ठ भारत' असा नारा देतात, भारताच्या दक्षिणेला उत्तरेशी जोडण्याचा प्रयत्न करू लागतात, तेव्हा काँग्रेसचे नेते आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांचे भाऊ डीके सुरेश हे दक्षिण भारताला देशापासून वेगळे करा, अशी मागणी करतात.. हे काय आहे? विरोधी पक्ष आपल्या राजकीय फायद्यासाठी 'एकसंध भारत' हीच कल्पना पणाला लावतात. यातील प्रत्येक निर्णयावर अतिसंशय घेऊन या देशाला एकसंध होण्यास रोखतात, या देशाच्या एकतेच्या विरोधात हेच 'हात' उभे राहतात हे ते 'हात' आहेत जे गेली दहा वर्षे अतिसंशय निर्माण करीत आहेत, तेच 'हात' आता युद्ध म्हणून ही निवडणूक लढत आहेत. त्यांचे हे युद्ध नेमके काय आहे? हे देशाच्या अखंडतेच्या विरोधातील षड्यंत्र तर नाही ना? हे सांगण्यासाठी केलेला हा एक प्रयत्न!

## Aryan Kanojia : The Indian star shining in Dubai




■ THANE :

Aryan Manoj Kanojia, a karate student studying in St. John Baptist School, Thane, has become a gold medal winner while leading the country in the International Budokan Karate Competition. He is being showered with accolades across the country for his success. 828 competitors from 16 countries around the world participated in the Dubai Badokan Cup 2024 International Karate Tournament held in Dubai. Contestants from UAE, Japan, Kuwait, Saudi Arabia, Kazakhstan, China, Japan, Nepal, Pakistan, Oman, Philippines, Indonesia, Bhutan, UK and Australia participated in this. Participating Aryan Manoj Kanojia, a fourth standard student of St. John's School, who lives in Chandanwadi division of Thane city, led India to a gold medal under the tutelage of his coach Fraz Sir. He is showered with praise in Thane city for his success.

## Supreme Court says it may consider interim bail for Kejriwal considering polls, hearing on May 7

■ NEW DELHI :

The Supreme Court on Friday told the Enforcement Directorate that it may consider the question of interim bail for Arvind Kejriwal because of elections. The top court asked the ED counsel to come prepared on this aspect when it takes up the matter on Tuesday (May 7). "We may grant or we may not grant. But we must be open to you as neither side should be taken by surprise," a bench of Justice Sanjiv Khanna and Dipankar Datta said, alerting both sides to not assume that the court will grant bail. It asked the ED to come up with possible conditions to be imposed on Kejriwal if interim bail is granted to the Delhi chief minister. The court also asked the ED to consider whether Kejriwal should be signing any files considering his position as the chief minister. "Please also take instructions - we are not saying anything (on whether bail will be granted or not) - we would like to consider grant of interim bail because of elections. Dr. Singhvi



don't start without even hearing us - we may or may not grant. We are going to hear you. We must be open to you, because neither side should be taken by surprise. Second ... Because of the position you (Kejriwal) hold, whether you should be signing any files? We are being open, do not assume anything ... Do not read anything into it! We are not saying either way," Justice Khanna said.

Arvind Kejriwal was arrested on March 21 by the ED in a money laundering case linked to Delhi's now-scrapped excise policy. All his bail pleas have been rejected so far while the BJP has raised demand for his resignation from the chief minister's post. While Kejriwal continued on the chief minister's post, his wife Sunita Kejriwal participated in the Aam Aadmi Party's campaigning for the look Sabha election. On Friday, the Delhi High Court dismissed a plea challenging the arrest of Chief Minister Arvind Kejriwal in a money laundering case stemming from the excise policy scam, saying it is not maintainable. The high court said Kejriwal admittedly has the means and wherewithal to approach the court and file appropriate proceedings. "This court is of the view that the present writ petition which effectively challenges the arrest of the national convenor of AAP ... is not maintainable as the said person is in judicial custody in pursuance to judicial orders, which are not a subject matter of the present petition. The petition conspicuously fails to name the person though the identity is apparent due to the references made to his political standing/position," a bench of acting Chief Justice Manmohan and Justice Manmeet PS Arora said.

### अपघातांचा आलेख चढताच

## तीन महिन्यांत ३७० अपघात, ठाण्याच्या परिवहन आयुक्तांनी घेतली गंभीर दखल



■ ठाणे : दरवर्षी रस्ते अपघातांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक मृत्युमुखी पडत असून, अपघातांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत आणि ग्रामीण भागांत जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत एकूण ३७० अपघात घडले. त्यात ११० जणांचा मृत्यू झाला आहे. याच तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत यंदा अपघातांच्या संख्येत ४७ने; तर मृतांच्या संख्येत १४ने वाढ झाली आहे.

'आरटीओ'च्या ठाणे कार्यालयाच्या क्षेत्रातही अपघातांचा आलेख वर सरकल्याने याची गंभीर दखल परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी घेतली आहे. अपघात रोखण्यासाठी नेमक्या काय उपाययोजना केल्या आहेत, याची झाडाझडती घेण्यासाठी आयुक्तांनी ठाण्यातील आरटीओ अधिकाऱ्यांना बोलवले होते. रस्ते अपघातांवर नियंत्रण मिळवण्याचे मोठे आव्हान सरकारी यंत्रणेपुढे असून खराब रस्ते, वाहन सुस्थितीत नसणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणे, वेगात वाहन चालवणे आदी विविध कारणांमुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे. या अपघातांमध्ये हकनाक नागरिकांचे बळी जात आहेत.

प्रत्येक वर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबवले जाते. तरीही अपघातांचे प्रमाण कमी होत नसून, रस्त्यावरील 'ब्लॉक स्पॉट'ही जीवघेणे ठरत आहेत. ठाणे जिल्ह्यातही दरवर्षी मोठ्या संख्येने अपघात घडत असून, या अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या चिंताजनक आहे.

## "Virat opens, Rohit bats at number three": Ajay Jadeja

■ SPORTS :

Ahead of the T20 World Cup 2024, former all-rounder Ajay Jadeja wants Rohit Sharma to bat at number three and instead Virat Kohli should open the innings for India. The T20 World Cup 2024 is set to begin in June in the USA and the West Indies. India announced their 15-man squad for the T20 World Cup and will begin their campaign against Ireland on June 5. "For me, Virat Kohli opens. Who goes back? Rohit Sharma bats at three. He gets a little cushion and





gets to understand the game, he has so much going on, in his mind as a captain," Jadeja told Jio Cinema. "If you have Virat in your side, you know consistency is the one thing you will get, so, might as well use him. He's best at the top and the powerplay allows him to settle in," he added.

Ahead of the T20 World Cup 2024, Ajay Jadeja also backed the selection of all-rounder Hardik Pandya who is currently struggling with his form. "The spotlight is on him for obvious reasons. He's a special player, a rare commodity you find in our country where somebody bowls seam-up and can make it to the side with his batting," he said referring to the furore caused by his elevation to Mumbai Indians captaincy replacing Rohit. Pandya, who is enduring a poor run in the IPL 2024, will be Rohit's deputy during the T20 World Cup 2024. "The selection has not been on form, there's no doubt about it. It depends on how you want to play. It's one of the things I look at this team and think they don't have many options.

"You have established players in the side, everybody is so solid with the numbers that they play at, and what stage they play. It will all depend on what Rohit thinks," Jadeja said.

## Can't stop 'Rahul Gandhi' or 'Lalu Yadav' from contesting polls: SC on namesake candidates



■ NEW DELHI :

An individual cannot be asked not to contest an election just because they share their name with a politician, the Supreme Court observed on Friday. A three-judge SC bench headed by Justice BR Gavai, also comprising Justices Satish Chandra Sharma and Sandeep Mehta, made the remark even as it dismissed a plea seeking directions to the Election Commission of India (ECI) to take "urgent steps" to solve the issue of namesake candidates in polls.

"If somebody is born as Rahul Gandhi or Lalu Prasad Yadav, how can they be prevented from contesting elections? Would this not affect their rights? If someone's parents have given a similar name (to a political leader), can it come in their way of their right to fight elections?" the bench asked advocate VK Biju, who appeared for the petitioner, Sabu Steephen.

"You know what is the fate of this case," the judges told the advocate and permitted him to withdraw the plea.

In his plea, Steephen, the petitioner, had described the practice of fielding namesake candidates as "wrong" and an "old trick designed to create confusion in the minds of voters." Such a practice, it stated, must be curtailed on a "war-footing" as "each and every vote has the power to decide a candidate's future." "The confusion arising in such cases must be replaced with clarity, and this can be proper amendment, modifications in the Representation of the People Act, 1951 and Conduct of Elections Rules, 1961," Steepehen contended. He also expressed apprehension that the namesake candidates may not have knowledge and awareness about the political and administrative systems in India, and could bee getting "sponsorships" from rival political parties. He, however, clarified that he was not claiming that all independent candidates in a poll, are "fake."

## सिव्हील रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना जेवणाची सोय

■ **ठाणे** : रुग्ण रुग्णालयात उपचार घेत असताना सोबत येणाऱ्या त्याच्या नातेवाईक मित्रमंडळींची जेवणाची चांगलीच तारांबळ उडते, अनेकवेळा रस्त्यावर वडापाव चहा बिस्कीट खाण्याची स्थिती असते. परंतु सिव्हील रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी दुपारी आणि रात्रीच्या सत्रात मोफत जेवणाची सोय केली आहे. रुग्णालयात दर दिवशी सुमारे ५०० ते ६०० रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात. यामध्ये ठाणे पालघर जिल्ह्याच्या शहरी ग्रामीण आणि दुर्गम आदिवासी पाड्यातील रुग्णांची संख्या अधिक असते.काही वेळा रुग्ण ॲडमिट झाल्यावर त्याच्या नातेवाईकांना रुग्णालयातच थांबावे लागते. मात्र जेवणाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली आहे. जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. कैलास पवार अणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत जेवणाची सोय केली आहे.

# पहिल्याच महिन्यात ६५ कोटी वसूल !

## एप्रिल महिन्यातील ठाणे महापालिकेची कामगिरी

■ **ठाणे** : ठाणे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने यंदाच्या आर्थिक वर्षात पहिल्या महिन्याभरातच ६५ कोटी ५० लाख रुपयांची कर वसूली केली आहे.यंदाच्या अर्थसंकल्पात मालमत्ता कराच्या मार्फत ८१९ कोटी ७१ लाख रुपयांचे लक्ष देण्यात आले आहे. त्यादृष्टीने महापालिकेने आतापासूनच प्रयत्न सुरु केले आहेत.त्याचे परिणाम आता दिसून आले.कर भरण्यासाठी ठाणे सजग झाल्याचे यातून दिसून येत आहे.

ठाणे महापालिकेने २०२३-२४ मध्ये एकूण ७५० कोटी रुपये वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. मात्र यात ७०३ कोटी ९३ लाख रुपयांची वसूली झाली होती.तेव्हा महापालिकेच्या एकूण नऊ प्रभाग समित्यांमध्ये माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमध्ये सर्वाधिक २२० कोटी ४१ लाख रुपयांची वसूली झाली . तर कळव्यात सर्वात कमी २४ कोटी ७८ लाख रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला होता .जकात आणि एलबीटीसारखे करवसूलीचे स्रोत बंद झाल्यानंतर ठाणे महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत मालमत्ता कर आहे. मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासन मालमत्ता जप्तीसह विविध डावपेच अवलंबते, मात्र असे करूनही उत्पन्नात घट होत आहे.

मागील आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३१ मार्चपर्यंत मालमत्ता कराचे ७०३ कोटी ९३ लाख रुपये ठाणे महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले होते.विशेष म्हणजे त्या आधी २०२२-२३ या वर्षासाठी ७१३ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, तेव्हा ७११ कोटी रुपये वसूल करण्यात महापालिका मालमत्ता कर विभागाला यश आले होते. तेव्हा अंदाजे ९९.८० टक्के कर जमा झाला होता. मात्र गत वर्षी महापालिकेच्या कर विभागाला ९४ टक्के कर वसूल करण्यात यश आले आहे. जे आधीच्या वर्षीच्या तुलनेत ६ टक्के कमी होते.यंदाच्या आर्थिक वर्षात सुरवातीपासूनच महापालिकेच्या मार्फत मालमत्ता कर वसूलीच्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले. त्याची प्रचिती म्हणजे १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत ९ प्रभाग समिती स्तरावर एकूण ६५ कोटी ५० लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल झाला आहे.विशेष म्हणजे महापालिका आयुक्त सौरव राव हे याबाबत लक्ष ठेवून आहेत. त्यांनी स्वतः मागील काही दिवसात प्रभाग समित्याना भेटी दिल्या होत्या. या भेटीत मालमत्ता आणि पाणी बिलाची वसुली काटेकोरपणे करण्याच्या सूचना अधिकारी वर्गाला दिल्या. त्याची परिणीती म्हणजे पहिल्याच महिन्यात मालमत्ता कराच्या वसूलीने ६५ कोटी ५० लाख पर्यंतचा टप्पा गाठला. मालमत्ता कराच्या वसूलीसाठी ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयाकडील संकलन केंद्र तसेच मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्रामधील संकलन केंद्र कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी साडे पाच वाजेपर्यंत सुरु आहेत. तर शनिवारी व सर्व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी साडेचार वाजेपर्यंत ही कार्यालय कार्यरत राहणार आहेत.

| प्रभाग समिती | वसूल रक्कम |
|---|---|
| मानपाडा -माजिवडा | २४ कोटी ९ लाख |
| उथळसर | ५ कोटी ५१ लाख |
| वर्तकनगर | १२ कोटी २८ लाख |
| मुंब्रा | १ कोटी ९६ लाख |
| दिवा | १ कोटी ३८ लाख |
| वागळे इस्टेट | १ कोटी १५ लाख |
| नोपाडा-कोपरी | ५ कोटी १६ लाख |
| लोकमान्य- सावरकरनगर | २ कोटी ५४ लाख |
| कळवा | १ कोटी ९५ लाख |
| मुख्यालय | ९ कोटी ४८ लाख |
| एकूण | ६५ कोटी ५० लाख |

## दुकानदाराला बेदम मारहाण



■ **उल्हासनगर** : उल्हासनगरच्या मुख्य बाजारात असलेल्या दुकानात शोभेच्या वस्तू घेण्यासाठी आलेल्या तीन ग्राहकांकडे पैशाची मागणी केल्यावर त्यांनी दुकानदाराला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

उल्हासनगर कॅम्प दोन मधील अमन टॉकीज मार्केटमध्ये गुरुमुख माखिजा यांचे महालक्ष्मी ट्रेडर्स दुकान आहे. दुकान बंद करण्याच्या वेळी दिलजित मनजितसिंग लबाना, जयसिंग दिलीपसिंग लबाना आणि सन्नी जगदिश जिनवाल हे आले. त्यांनी दोन शोभेचे कागदी बंब विकत घेतले. त्याचे पूर्ण पैसे न देता उर्वरीत रुपयांची मागणी त्या तिघांकडे केली. त्याचा त्यांना राग येवून त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण केली. त्यावेळी शेजारी दुकानदार गुरमुख यांच्या मदतीसाठी येत असताना आरोपी दिलजित लबाना याने त्यांच्या हातातील रॉड त्यांच्या दिशेने हवेत फिरवून 'कोई हमारे बिच आऐगा तो उसे भी हम जिंदा नही छोडेंगे' असे बोलल्याने दुकानदार तेथून पळून गेले. गंभीर जखमी झालेले गुरमुख माखीजा याना उपचारासाठी मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना प्राथमिक उपचार दिल्यानंतर घरी पाठवण्यात आले. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुरमुख यांच्या फिर्यादीवरून दिलजित मनजितसिंग लबाना, जयसिंग दिलीपसिंग लबाना आणि सन्नी जगदिश जिनवाल याना जीवे ठार मारण्याच्या प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

## कल्याणमध्ये २०० दारूच्या बाटल्या जप्त

■ **कल्याण** : लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण परिसरात चोरट्या मार्गाने दारूची आवक वाढली आहे. बुधवारी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन असल्याने दारू विक्रीवर बंदी होती. मात्र तरीही कल्याण पूर्वेतील तिसगाव भागात चोरट्या मार्गाने दारूचा साठा आणून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती कल्याण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी विजयनगर नाक्याजवळ सापळा रचून चोरून दारू विक्री करणाऱ्या कैलास काशिनाथ कुऱ्हाडे (४५, रा. जनाबाई निवास चाळ, तिसगाव) याच्या घरात छापा मारला. त्यावेळी तेथे देशी, विदेशी दारूच्या २०० हून अधिक बाटल्या आढळल्या.

## आंब्याची बाग जळून खाक, लाखोंचे नुकसान



■ **विक्रमगड** : विक्रमगड तालुक्यातील ओंदे येथील महिला शेतकऱ्याच्या आंब्याच्या बागेला आग लागली. आगीत आंब्याची व चिकूची झाडे जळून खाक झाली आहेत. ही घटना मंगळवारी घडली. आगीचे कारण समजू शकले नाही. मात्र महावितरणची लाईन बागेवरून गेल्याने शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. आगीमुळे बाग जळून खाक झाल्याचा अंदाज मालकाने व्यक्त केला आहे. दुपारची वेळ असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. बाग आणि शेतकऱ्याच्या घरात २ किमीचे अंतर आहे. त्यामुळे आग लागल्याचे समजेपर्यंत बहुतांश झाडे होरपळली. ओंदेच्या तलाठ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. उर्मिला उदय सांबरे याच्या बागेतील २५ वर्षांची आंब्याची २५ कलमे, चिकूची २५ कलमे होरपळली. तर लाखोंचे नुकसान झाल्याचा पंचनामा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## जव्हार फाटा, कसाराघाट वळण 'जीवघेणे'

### मुंबई-नाशिक महामार्गावर वाहन चालकांना पर्यायी रस्त्याची प्रतीक्षा



■ **कसारा** : मुंबई नाशिक महामार्गाच्या जव्हार फाटा ते जुना कसारा घाट वळणावर वाहन चालकांसाठी धोक्याची घंटा वाजत आहे.पर्यायी मार्ग नसल्याने जव्हार मार्गाने कसारा दिशेने जाणाऱ्या वाहन चालकांना जीव धोक्यात घालून वाहन चुकीच्या दिशेने चालवावे लागत आहे.कित्येक वर्षांपासूनच्या पर्यायी मार्गाचा तिढा सोडविण्यास प्रशासन असमर्थता दर्शवत असल्याने कसारा घाट परिसरातील नागरिक या वर्षी होईल,पुढच्या वर्षी होईल याच आशेने पर्यायी मार्गाच्या प्रतिक्षेत आहेत.

मुंबई नाशिक महामार्गावर असलेल्या कसारा घाटाची आगळीवेगळी ओळख राज्याच्या विविध कोपऱ्यात निर्माण झालेली आहे.अवघड नागमोडी वळणे व नेहमीच वाहनांच्या वर्दळीत अडकणारा कसारा घाट,या घाट मार्गाहून दररोज अर्थात दिवसरात्र हजारो वाहने धावत असतात.घाट मार्गात मुंबई आणि नाशिक असा २ स्वतंत्र वाहिन्यांची निर्मिती झाल्यापासून 'वन-वे' म्हणून वाहनचालक वाहन बिनधास्त व भरधाव वेगाने दामटत असतात. अशातच जव्हार फाटा ते कसारा घाट पर्यंत नाईलाजास्तव चुकीच्या मार्गाचा अवलंबन करून वाहन चालक कसारा दिशेने वाहन नेत असतात.त्यामुळे नाशिक दिशेने येणारे वाहन आणि जव्हार फाटा मार्गाहून कसारा घाट उतरणारे वाहन समोरासमोर धडकून अपघात घडत असतात.अशा घटना यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत.वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. अपघातातून मनुष्यहानी होत असताना सुद्धा प्रशासनातील अधिकारी कायद्यावर बोट ठेवून जागेचा मुद्दा उपस्थित करून पर्यायी मार्ग निर्मितीला आडकाठी करत असल्याचे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे.गेल्या १३ वर्षांपासून इथले लोकप्रतिनिधी केवळ निवेदने, आंदोलनांच्या बाबतचा उठवत प्रशासनाला घेरण्याचा प्रयत्न करत असले तरी त्याचा मागोवा घेण्यास सपशेल फोल फोल ठरत असल्याचे दिसून येत आहे.प्रशासनातील अधिकारी आणि लोकप्रतिनिधी केवळ नाटक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## महिला मृत्युप्रकरणी चालकावर गुन्हा

■ **ठाणे** : टीएमटी बसमधून उतरताना बस चालकाच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याचा गुन्हा नौपाडा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला असून ही घटना २५ एप्रिल रोजी नितीन कंपनी परिसरात घडली होती. राहुल सुरेश खरीवले यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांची आई सुरेखा खरीवले (वय-५५) या अपघात मृत्युमुखी पडली आहे.नितीन कंपनी जंक्शन बसस्टॉपवर ठाणे महानगर पालिकेच्या प्रवासी बसच्या दरवाजाने खाली उतरत असताना त्या तोल जावून खाली पडल्या त्यात त्यांचा मृत्यू झाला.

## ठाण्यात मतदान जनजागृतीला मिळतोय उत्तम प्रतिसाद

■ **ठाणे** : ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी येत्या २० मे रोजी मतदान होत आहे. या वेळी मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी ठाणे-लोकसभा मतदार संघांतर्गत ठाणे विधानसभा मतदार संघ स्वीप अंतर्गत विविध ठिकाणी घेण्यात येणाऱ्या मतदान जनजागृती कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत आहे .दुय्यम निबंधक हे विशेष विवाह नोंदणीचे काम करतात. दुय्यम निबंधक कार्यालयात विवाह नोंदणी करण्यासाठी नववधू-वर व वऱ्हाडी यांची नेहमीच वर्दळ असते. त्यामुळे येथील दुय्यम निबंधक कार्यालयात लग्नाच्या नोंदणीसाठी आलेल्या नववधू-वरांसह वऱ्हाडींमध्ये मतदान करण्याबाबत स्वीप टीमने जनजागृती केली. यावेळी दुय्यम निबंधक कार्यालयात आलेल्या सर्व वऱ्हाडींकडून 'मी मतदान करणारच' असे अभिवचन घेण्यात आले.महाराष्ट्र विद्यालय,चरई येथे मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमाला शिक्षकवर्ग,कर्मचारी व विद्यार्थीवर्ग मोठया प्रमाणावर उपस्थित होता.

मागील निवडणुकीतील मतदानाच्या टक्केवारीपेक्षा यावेळच्या मतदानामध्ये मतांची टक्केवारी वाढवायची आहे.यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन स्वीप पथकाने केले. यावेळी विद्यार्थ्यांनी पालकांना पत्र लिहून आम्ही मत देऊ शकत नाही,पण तुम्ही द्या ! मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून बाहेर फिरायला न जाता, घरी न थांबून मतदान केंद्रावर जाऊन मतदान करा असे आवाहन केले. मतदान जनजगृती कार्यक्रम सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आसावरी संसारे, स्वीप पथक प्रमुख सोपान भाईक यांच्या नेतृत्वामध्ये पार पडला.लोकसभा निवडणुकीच्या मतदानात ठाणे जिल्ह्यातील महिलांचा टक्का वाढविण्यासाठी वाढवण्यासाठी ठाणे-लोकसभा मतदार संघअंतर्गत,ठाणे विधानसभा मतदार संघात स्वीप कार्यक्रमाअंतर्गत ठाणे विधानसभा मतदार संघाच्या स्वीप टीमने भांजेवाडी येथील उतेकर चाळीत महिला बचत गटांच्या महिलांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले.

## छताचे प्लास्टर पडल्याने कोपरीत एकजण जखमी



■ **ठाणे** : ठाणे पूर्वेकडील कोपरी गावदेवी मंदिर परीसरातील ४० ते ५० वर्षे जुन्या शारदा भवन या तळ अधिक तीन मजली इमारतीतील पहिल्या मजल्यावरील सदनिकेचे प्लास्टर कोसळून एक तरूण जखमी झाल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री घडली.

शैलेश शर्मा आणि बंधूंच्या मालकीची असलेल्या या इमारतीत एकुण २२ सदनिका असून स्ट्रक्चरल ऑडिट नंतरच इमारतीवरील कारवाई बाबत निर्णय घेतला जाईल. अशी माहिती घटनास्थळी भेट दिलेल्या ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, इमारतीच्या मालकांकडून इमारतीच्या दुरुस्तीबाबत अक्षम्य हेळसांड केली जात असल्याचा आरोप येथील सदनिकाधारकांनी केला.

कोपरीतील गावदेवी मंदिरासमोरील चिंचोळया गल्लीत शारदा भवन ही ४० ते ५० वर्ष जुनी तळ अधिक तीन मजली इमारत आहे. मंगळवारी मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास पहिल्या मजल्यावरील श्रीमती सरोजिनी मुर्तूडकर यांच्या सदनिकेतील छताचे प्लास्टर कोसळले. यात अनिकेत मुर्तूडकर (२१) यांच्या पायाला किरकोळ जखम झाली. इमारतीमध्ये एकूण २२ सदनिका असून त्यातील १० ते १२ सदनिकांमध्ये प्लास्टरला व कॉलमला तडे गेल्याने रहिवाशी धास्तावले आहेत.

सद्यस्थितीत या सदनिकेत राहणाऱ्या तीनही रहिवाशांना बाहेर काढण्यात आले असून तात्पुरत्या स्वरुपात त्यांना दुसऱ्या ठिकाणी राहण्यास सांगितले आहे. घटनास्थळी ठाणे मनपाच्या बांधकाम विभागाचे उपनगर अभियंता व उपअभियंता, अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तसेच कोपरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.तसेच, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश इमारत मालक व रहिवाशांना दिले. स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानंतर इमारतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे.दरम्यान, शारदा भवन इमारतीचे मालक शर्मा बंधू यांच्याकडून सदनिकांच्या दुरुस्ती आणि डागडुजीबाबत नेहमीच अडवणूक केली जात असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. त्यामुळे धास्तावलेल्या रहिवाशांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्याचे सांगितले.

# सोशल मीडिया राजकीय पक्षांचा आधुनिक 'प्रचारदूत'!

## व्हिडीओ, पोस्ट व्हायरल करून उडवला जातोय प्रचाराचा धुरळा

■ **बदलापूर** : सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीच्या प्रचारासाठी रॅली, सभांद्वारे शक्तिप्रदर्शन करण्याचा प्रयत्न होत आहेच. त्याचबरोबर सोशल मीडियावर व्हिडिओ, पोस्ट व्हायरल करून प्रचाराचा धुरळा उडवला जात आहे. इतकेच काय तर मतदारांना मतदान स्लिपही देण्यासाठी सोशल मीडियाचा वापर होत आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत राजकीय पक्षांसाठी सोशल मीडिया हा आधुनिक प्रचारदूत ठरताना दिसत आहे.



आतापर्यंतच्या अनेक निवडणुकीत जाहीर सभा, प्रचार फेरी, चौकसभा, घरोघरी वा भागाभागात जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेणे, रिक्षा वां एखाद्या वाहनात लाऊड स्पीकर लावून उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन करणे, जाहीरनामा-मतदार स्लीप घरोघरी वाटप करणे अशा पारंपरिक पद्धतीने निवडणुकीचा प्रचार होत असल्याचे पाहिले आहे. परंतु गेल्या काही वर्षात सोशल मीडियाचा झपाटयाने प्रसार झाला आहे. किंबहुना सोशल मीडियाचा वापर करत नाही असा माणूस सापडणे दुर्मिळ अशी परिस्थिती आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी हळूहळू निवडणूक प्रचारासाठी सोशल मीडियाचा वापर करण्यास सुरुवात केली. आणि यंदाच्या निवडणुकीत व्हॉट्स अप, फेसबुक, इंस्टग्रम यासारखा सोशल मीडिया राजकीय पक्षांसाठी आधुनिक प्रचारदूत ठरू लागल्याचे दिसत आहे.संपर्काचे प्रभावी साधन व करमणुकीचे साधन म्हणून महिला, पुरुष, आबालवृद्ध असे सर्वच लोक सोशल मीडियाशी जोडले गेलेले आहेत.

शहरी भागात राहणाऱ्या व्यक्तिपासून ते अगदी दुर्गम भागातल्या बहुतांश लोकांकडे मोबाईल असून त्यामध्ये ते सोशल मीडियाचा वापर करत असतात. त्यामुळे सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून कार्यकर्त्यां मार्फत अशा मतदारांपर्यंत जलद तसेच वैयक्तिक संपर्क करणे राजकीय पक्षांना व त्यांच्या उमेदवारांना सहज शक्य होत आहे. हे लक्षात घेऊन राजकीय पक्षांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी सोशल मीडियाच्या वापरावर अधिक भर दिला आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राजकीय पक्ष आपल्या पक्षाच्या विविध पोस्ट, सभांचे, रॅलीचे, आपल्या पक्षाला मतदान करण्याचे आवाहन करणारे व्हिडिओ सोशल मीडियावर टाकत आहेत. उमेदवारांचे जाहीरनामे, वचननामे इतकेच काय पण मतदार स्लीपही व्हॉटस अप सारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट मतदारांपर्यंत पोहचवली जात आहे. त्यामुळे केवळ एका क्लिकने हजारो लाखो मतदारांपर्यंत लोकांपर्यंत उमेदवारांना पोहचवणाऱ्या सोशल मीडियाला यंदा राजकीय पक्षांनी अधिक पसंती दिली असल्याचे पाहायला मिळत आहे.

> "बदलापूरात भाजप पेपरलेस बुथची उभारणी करत आहे. मतदारांना मतदान स्लीपही डिजिटल स्वरूपात पाठवल्या जात आहेत. त्याशिवाय जाहीरनामाही डिजिटल असणार आहे. लवकरच हा डिजिटल जाहीरनामा प्रसिद्ध केला जाणार आहे.
>
> **-राजेंद्र घोरपडे**
> माजी नगराध्यक्ष, भाजप

> "सोशल मीडिया हे एक प्रभावी शस्त्र आहे .कमीत कमी वेळात मतदारांपर्यंत चिन्ह पोहचवणे आमच्यासाठी आव्हान होते. पारंपरिक प्रचार पद्धतीला सोशल मीडियाची जोड दिल्यामुळे अगदी दुर्गम भागातील मतदारांपर्यंत पोहचणे शक्य झाले आहे.
>
> **- शैलेश वडनेरे**, शहराध्यक्ष,
> राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

## कारमधून लांबवला लॅपटॉप आणि दस्तावेज

■ **ठाणे** : ठाण्याच्या वाघबीळ परिसरातील रुग्णालयात रुग्णाला भेटण्यासाठी आलेल्या नागरिकाच्या मोटारीतील लॅपटॉप बॅग पळवून नेली. त्यात गाड्यांच्या चाव्या आणि गाड्यांचे दस्तावेजही होते. ही घटना बुधवारी रात्री घडली. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरटयाच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदार अविनाश शंभूदयाल माखरिया(३७) यांनी दिलेल्या माहितीनुसार घटनेच्या दिवशी माखरिया रुग्णालयात दाखल असलेल्या त्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी आले होते.त्यांच्या वापरातील डेल कंपनीचा लॅपटॉप, घराच्या आणि वाहनांच्या चाव्या, तसेच वाहनांची कागदपत्रे पोर्टेबल हार्ड डिस्क अशा वस्तू असलेली बॅग कारमध्ये ठेवून ते रुग्णालयात गेले. कार लॉंक असतानाही अज्ञात चोरटयाने ती बॅग कार मधून लांबवली. अज्ञात चोरटयांच्या विरोधात कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यस्तरिय शॉर्ट फिल्म स्पर्धेत "तेजोमयी दिवस" लघुपटाची बाजी




अथर्व थिएटर आयोजित शॉर्ट फिल्म स्पर्धेमध्ये "तेजोमयी दिवस" हा लघुपट शैक्षणिक विभागात सर्वोत्कृष्ट ठरला असून लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक अजय लिंबाजी पाटील यांना मिळाला आहे. विद्याथीर्नीची भूमिका करणाऱ्या शिवानी रवी संभाजी हिला उत्कृष्ट अभिनयासाठी पारितोषिक मिळाले आहे. "तेजोमयी दिवस" हा लघुपट दहा ते चौदा वयोगटातील मुलींना येणाऱ्या मासिक पाळीच्या विषयावर आधारित आहे. मासिक पाळीमुळे ग्रामीण भागातील मुली शाळेमध्ये येत नाहीत. त्यांची शाळा बुडते. अशावेळी या मुलींमध्ये त्याचबरोबर पालकांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांचा अभ्यास बुडू नये या उदात्त हेतूने "तेजोमयी दिवस" या लघुपटाचे निर्मिती केल्याचे लेखक - दिग्दर्शक अजय पाटील यांनी सांगितले. शिवाजी मंदिर दादर मुंबई येथे झालेल्या एका शानदार सोहळ्यात विरेंद्र नेवरेकर व विणा नेवरेकर यांच्या शुभहस्ते अजय पाटील यांनी पारितोषिक स्वीकारले. या लघुपटात ज्योती अय्यर, सुनिता कांबळे, कविता पवार, पंकज चव्हाण, शारदा चौधरी, महेंद्र अढांगळे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. लवकरच हा लघुपट युट्युबवर रिलीज केला जाणार आहे.

## कॉन्स्टेबलचे मोबाईल गुंडांनी पळवले, पाठलाग केल्यावर विषारी इंजेक्शन दिले

**असा पळवला मोबाईल**

मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले ३० वर्षीय कांस्टेबल विशाल पवार ठाणे शहरात राहतात. २८ एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजता ड्यूटी संपवून लोकलने घरी जात असताना ही घटना घडली. ते साध्या कपड्यांमध्ये होते. लोकल माटुंगाजवळ असताना स्लो झाली. त्यावेळी एका गुंडाने त्यांचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मोबाईल खाली रेल्वे ट्रॅकवर पडला. तो गुंड मोबाईल उचलून घेऊन पळू लागला. कॉन्स्टेबल पवार यांनी त्याचा पाठलाग सुरु केला.

■ **मुंबई** : चोरटे, गुंडामध्ये पोलिसांची दहशत राहिली नाही. पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे मोबाईल लांबवण्याची हिंमत त्यांच्यात आली. त्यानंतर पाठलाग करणाऱ्या पोलिसाला गुंडाच्या टोळक्याने घेरुन मारहाण केली. विषारी इंजेक्शन दिले. या घटनेत उपचार सुरु असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकारामुळे मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली आहे. पोलीस कर्मचाऱ्यांबाबत असे प्रकार घडत असतील तर सर्वसामान्य लोकांची काय परिस्थिती असणार? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पवार त्या गुंडांच्या मागे काही आंतर गेले. त्यानंतर एका टोळक्याने त्यांना घेरले. त्यांना मारहाण केली. त्यांच्या शरीराला विषारी इंजेक्शन टोचले. तसेच लाल रंगाचे लिक्वीड त्यांच्या तोंडावर फेकले. त्यामुळे पवार त्या ठिकाणीच बेशुद्ध झाले. त्यांनी त्या ठिकाणी असलेल्या काही जणांनी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या नातेवाईकांना माहिती देण्यात आली. दुसऱ्या दिवशी ते शुद्धीवर आले. रुग्णालयात उपचार सुरु असताना त्यांचा प्रकृती अधिकाच बिघडली. परंतु उपचार सुरु असताना त्यांचे निधन झाले. मृत्यूपूर्वी पोलिसांनी रुग्णालयात त्यांचा जबाब नोंदवला होता. यानंतर अज्ञात चोरट्यांविरुद्ध आणि अमली पदार्थांचे व्यसन करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. हे प्रकरण रेल्वे पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे.